मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 16 जानेवारी 2025 | पान- 1

# जप्त केलेल्या मालमत्तेचे सील तोडल्याप्रकरणी गुन्हा दाखल

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन विभागाची चिखली परिसरात कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरल्याने जप्त करण्यात आलेली सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँड कॉलेज, पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली या मालमत्तेचे सील तोडून आतमध्ये प्रवेश केल्याप्रकरणी महापालिकेच्या कर संकलन विभागांनी गुन्हा दाखल केला आहे.

सुरेश विठ्ठल जाधव (रा.चिखली, पिंपरी-चिंचवड, पुणे) यांच्यावर मागील आठवड्यात (७ जानेवारी २०२५) चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी करसंकलन विभागाच्या चिखली विभागीय कार्यालयातील सहाय्यक मंडलाधिकारी बाळु रामचंद्र लोंढे यांनी फिर्याद दिली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ता कर वसुलीसाठी विविध मोहीम राबवल्या जातात. मालमत्ताधारकांना कर भरण्याचे वारंवार आवाहन करण्यात येते. वेळप्रसंगी नोटीस देण्यात येते. मात्र, त्यानंतरही मालमत्ता कर न भरल्यास मालमत्ता जप्त करून ती सील करण्यात येते. पण जप्त केलेल्या मालमत्तेच सील कर न भरता अनाधिकृतपणे तोडून मालमत्तेत प्रवेश केल्याचा प्रकार चिखलीत घडला आहे.

चिखली कर संकलन विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत गट क्र. ७९४ पवारवस्ती, कुदळवाडी येथे सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँड कॉलेज आहे. ही मालमत्ता मालमत्ताधारक सुरेश विठ्ठल जाधव यांची आहे. या मालमत्तेची कर थकबाकी बिलाची रक्कम व चालू वर्षाची मालमत्ता कराची रक्कम आणि लागलेल्या दंडाची रक्कम अशी एकूण २४ लाख ५९ हजार ८३८ रुपये तर, अवैध बांधकाम शास्ती कर रुपये ३० लाख ८९ हजार २२६ रुपये अशी एकूण रक्कम ५५ लाख ४९ हजार ०६४ रुपये येणे बाकी आहे. त्यापैकी अवैध बांधकाम शास्ती कर वगळून २४ लाख ५९ हजार ८३८ रुपये एवढा मालमत्ता कर भरल्यास अवैध बांधकाम शास्ती कर रुपये ३० लाख ८९ हजार २२६ रुपये माफ होणार आहे. मालमत्ता कर थकबाकी भरण्याबाबत वारंवार मालमत्ताधारक सुरेश विठ्ठल जाधव यांना कळविण्यात आले होते. परंतु त्यांनी त्यास टाळाटाळ केल्याने अखेर ३१ डिसेंबर २०२४ रोजी चिखली कर संकलन कार्यालयाने सदर मालमत्ता जप्त करून सील केली होती.

मागील आठवड्यात जप्तीची कारवाई करतेवेळी मालमत्ताधारक सुरेश जाधव यांनी पाच लाख रुपये भरतो, असे सांगितले. परंतु किमान ५० टक्के रक्कम ताबडतोब भरावे व उर्वरित ५०% रक्कमेचे पोस्ट डेटेड धनादेश द्यावेत अशा संबंधितांना सूचना दिल्या, परंतु त्यांची मालमत्ता कर भरण्याची मानसिकता नसल्याने त्यांनी मालमत्ता कर भरला नाही. त्यामुळे त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

### सील तोडून मालमत्तेत केला प्रवेश

**» करसंकलन विभागाने जप्त केलेल्या सरस्वती इंग्लिश मिडीयम हायस्कूल अँड कॉलेज या मालमत्तेत सुरेश विठ्ठल जाधव यांनी सील तोडुन ४ जानेवारी २०२५ रोजी प्रवेश केला. तसेच तेथील तोडण्यात आलेले नळ कनेक्शन ही अनाधिकृतपणे सुरू केले. अखेर याबाबत कर संकलन विभागाने मागील आठवड्यात ७ जानेवारी २०२५ रोजी गुन्हा दाखल केला आहे.**

“ कर संकलन विभागाने थकबाकी असणारा मालमत्ता कर आकारणीसाठी मोहीम हाती घेतली आहे. ज्या मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. अशांना वारंवार नोटीस देऊनही ते थकबाकी भरत नसतील, तर अशा मालत्ता जप्त करून सील करण्यात येत आहेत. जप्त केलेल्या मालमत्तांचे सील तोडल्यास संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, करसंकलन विभाग.**

# वाचन संस्कृती रुजविण्यासाठी महापालिका उपक्रम राबविणार

## महापालिकेच्या वतीने ‘ग्रंथ प्रदर्शन व सामुहिक वाचन’ या उपक्रमाचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

“पुस्तक वाचनाने मनुष्याचे मन प्रगल्भ होते, विचारक्षमतेला चालना मिळते. आजच्या डिजिटल युगात वाचन संस्कृती जिवंत ठेवणे हे अधिक गरजेचे झाले आहे,” असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.




महापालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमाअंतर्गत ‘ग्रंथ प्रदर्शन व सामुहिक वाचन’ या उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

या वेळी उपायुक्त पंकज पाटील, भारतीय वनसेवेतील सनदी अधिकारी रंगनाथ नाईकडे, नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत चाबुकस्वार, ‘यशदा’चे संशोधन अधिकारी बबन जोगदंड, क्रीडा अधिकारी अनिता केदारी माजी ग्रंथपाल, महाविद्यालयातील विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नाईकडे म्हणाले, “संतांनी व महामानवांनी आपले विचार आणि तत्वज्ञान मराठी भाषेत लिहिले असून, त्यांच्यानंतरही त्यांचे विचार पुस्तकाच्या रूपाने समाजात जिवंत आहेत. पुस्तकामुळे विचारांचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होते, त्यामुळे पुस्तक वाचन हे महत्त्वाचे आहे.”

‘ग्रंथ प्रदर्शन’ दालनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. पसायदान आणि भारतीय संविधानाचे प्रास्ताविक वाचून व्याख्यानाला सुरुवात झाली. ग्रंथपाल प्रमुख कल्पना जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन विकास गायकांबळे यांनी केले. राजू मोहन यांनी आभार मानले.

# पुणे रेल्वे यार्ड रिमॉड्युलिंगची कामे सुरु

## रेल्वे स्थानकावरील ताण होणार कमी : इलेक्ट्रॉनिक्स इंटरलॉकिंगच्या इमारतीचे काम युद्धपातळीवर

**पुणे | प्रतिनिधी**

बहुप्रतीक्षित पुणे रेल्वे स्थानकाच्या यार्ड रिमॉड्युलिंगच्या कामाला सुरुवात झाली आहे. मुंबईच्या दिशेकडील मालधक्का येथे यार्ड रिमॉड्युलिंगचा भाग असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स इंटरलॉकिंग इमारतीचे काम सुरू झाले आहे. हे काम जून 2026 पर्यंत पूर्ण करण्याचे रेल्वेच्या पुणे विभागाचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने रेल्वे प्रशासनाकडून कामे सुरू आहेत.

पुणे रेल्वे स्थानकावरील ताण प्रचंड वाढला आहे. येथून दोनशेपेक्षा अधिक रेल्वेगाड्यांची दररोज ये-जा असते. त्याद्वारे हजारो प्रवासी देशभरात प्रवास करतात. यामुळे पुणे रेल्वेस्थानक सातत्याने प्रवाशांसाठी अपुरे असल्याचे समोर येत आहे. सणासुदीच्या काळात तर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मसुद्धा प्रवाशांसाठी अपुरे पडत आहेत.



या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने पुणे रेल्वे स्थानकाचा यार्ड भाग असलेल्या मालधक्का परिसरात रिमॉड्युलिंग करण्याचे नियोजन केले. येथे नवीन प्लॅटफॉर्मसह प्रवाशांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरविण्याचे नियोजन केले आहे. या कामामुळे पुणे रेल्वे स्थानकावरील ताण काही प्रमाणात का होईना कमी होणार आहे. यामुळे रेल्वे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

### ...ही कामे होणार

पुणे स्थानकाचे प्लॅटफॉर्म वाढणार

सर्व प्लॅटफॉर्मवर लांब गाड्या उभ्या राहणार

पॉइंट्स आणि क्रॉसिंगची कामे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने होणार

रेल्वेलाइनचे अलाइंमेंट होणार

पुणे स्थानकादरम्यान असणाऱ्या सिग्नल यंत्रणेचे अत्याधुनिक पद्धतीने काम होणार

रेल्वेयार्डातील केबलिंगचे काम होणार

यार्डची कामे झाल्यावर हा फायदा होणार...

प्लॅटफॉर्म लांबी वाढल्याने जास्त डब्याच्या गाड्या पुणे स्थानकावर थांबणार.

जास्तीत जास्त प्रवाशांची वाहतूक होणार.

सिग्नलिंगमुळे रेल्वेगाड्यांना तातडीने क्रॉसिंग करता येणार.

प्रवाशांचा वेळ वाचणार. ?

प्रशस्त प्लॅटफॉर्मवर थांबता येणार.

### रिमॉड्युलिंगच्या प्लॅनचा अभ्यास

**» रेल्वेच्या बांधकाम विभागासह आरएलडीए, ऑपरेटिंग, विद्युतीकरण, सिग्नलिंग अँड टेलिकम्युनिकेशन, इंजिनिअर (रेल्वे ट्रॅक सिस्टिम), सीएनडब्लू, ईटीएल (इलेक्ट्रिकल ट्रेन लायटिंग), लोको, आरपीएफ, कमर्शिअल व अन्य सर्व विभागांकडून पुणे यार्ड रिमॉड्युलिंगच्या प्लॅनचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यानंतरच येथील कामाला सुरुवात करण्यात आली आहे. या कामाचा पहिला टप्पा सुरू झाला आहे.**

" पुणे रेल्वे स्थानक येथील यार्ड रिमॉड्युलिंगच्या कामाला सुरुवात झाली आहे. या कामाचा भाग असलेल्या इलेक्ट्रॉनिक्स इंटरलॉकिंग इमारतीचे काम सुरू झाले आहे. या इमारतीचे काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित कामे सुरू केली जातील. जून 2026 पर्यंत काम पूर्ण करण्याचे आमचे नियोजन आहे. यामुळे रेल्वे प्रवाशांना मोठा फायदा होणार आहे.

**- रामपाल बडपग्गा, जनसंपर्क अधिकारी, मध्य रेल्वे, पुणे विभाग.**

---

# बेवारस वाहने चार वर्षांपासून धूळखात

## वाहनांवर महापालिका आणि भोसरी वाहतूक पोलिसांद्वारे कारवाई करण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी येथील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखाली खंडोबामाळजवळील भागात वाहने पार्क केलेली आहेत. मात्र, ही वाहने काही महिन्यांपासून तेथेच पडून आहेत. त्यामुळे परिसराचे विद्रुपीकरण होत आहे. बेवारस स्थितीत असलेल्या या वाहनांवर महापालिका आणि भोसरी वाहतूक पोलिसांद्वारे कारवाई करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

भोसरीतील राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखाली पीएमटी चौक आणि संविधान चौकाजवळील भागात हातगाडीवाले, पथारीवाले, टपरीधारक यांचे पुनर्वसन केले आहे. उर्वरित भागात वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था केली आहे. मात्र, उड्डाणपुलाखाली खंडोबामाळ चांदणी चौकाजवळील भागात काही महिन्यांपूर्वी चार चाकी



वाहने आणून लावली आहेत. मात्र, त्याकडे वाहनांच्या मालकाने दुर्लक्ष केल्याने या वाहनांवर धूळ बसली आहे. त्याचप्रमाणे वाहनांची चाकेही पंक्चर झाली आहेत.

भोसरीतील दिघी रस्त्यावर गंगोत्री पार्कजवळील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळील (सीएमई) सीमा भिंतीलगतच्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात वाहने लावण्यात येतात. त्यामुळे ही वाहने बेवारस स्थितीत उड्डाणपुलाखाली पडली आहेत. त्याचप्रमाणे चांदणी चौकाजवळही काही दुचाकी बेवारस स्थितीत असल्याचे आढळून येते. त्यामुळे परिसराचे विद्रुपीकरण होत आहे.

### चार वर्षांपासून वाहने पार्क

**» भोसरी एमआयडीसीतील पेठ क्रमांक दहामधील प्लॉट क्रमांक १३३ जवळ एका कंपनीचे पाच ट्रक गेल्या चार वर्षांपासून रस्त्याच्याकडेला धूळखात आहेत. त्यामुळे रस्त्याने ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना मुख्य रस्त्याने जावे लागत आहे. काही ट्रकवर गवतही वाढले. या ट्रकद्वारे रस्त्याचा काही भाग व्यापल्याने इतर वाहनांसाठी रस्त्याची रुंदीही कमी झाली आहे.**

" भोसरी एमआयडीसी रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेल्या बेवारस वाहनांमुळे कंपनीत माल ने-आण करण्यासाठी येणाऱ्या वाहनांना अडथळा निर्माण होत आहे. त्याचप्रमाणे या बेवारस वाहनांमुळे रस्ता अडल्यामुळे कामगारांनाही मुख्य रस्त्याने चालावे लागते त्यामुळे त्यांचे जीविताला धोका निर्माण झाला आहे.

**- एक लघुउद्योजक, भोसरी एमआयडीसी.**

" भोसरी, इंद्रायणीनगर, भोसरी एमआयडीसी परिसरातील रस्त्यावरील बेवारस वाहनांवर पिंपरी-चिंचवड महापालिका आणि भोसरी पोलिस वाहतूक विभागाद्वारे संयुक्तपणे कारवाई करण्यात येईल. महापालिकेद्वारे जागा उपलब्ध करून त्या ठिकाणी बेवारस वाहने ठेवण्यात येतील.

**- दीपक साळुंके, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, भोसरी पोलिस वाहतूक विभाग.**

# सायकल ट्रॅक की अडथळ्यांची शर्यत?

## एकसलग नसल्याने करावा लागतो अनेक अडथळ्यांचा सामना, अनेक प्रकल्पांत सायकल ट्रॅक केल्याचा पालिकेचा दावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून विविध रस्त्यांवर स्मार्ट सिटी, अर्बन स्ट्रीट या प्रकल्पातून सायकल ट्रॅक तयार केल्याचा दावा केला जातो. परंतु, प्रत्यक्षात हे ट्रॅक सुरक्षित व सलग नाहीत. सायकल ट्रॅकवर वाहनांचे पार्किंग, अतिक्रमण, राडारोडा यांसारखे अनेक अडथळे असतात. त्यामुळे ट्रॅकवरून सायकलस्वारांना सायकल चालवता येत नाही. आम्हालाही शहरात सायकल चालवायची आहे, पण सायकल ट्रॅकवर निर्माण होणाऱ्या अडथळ्यांचे काय, असा सवाल सायकलस्वारांकडून उपस्थित केला जातो.



### 'बायसिकल शेअरिंग' उपक्रमही झाला बंद

» पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनीने शहरातील २०० पेक्षा अधिक ठिकाणी 'पब्लिक बायसिकल शेअरिंग' उपक्रम राबवला होता. अनेक स्मार्ट सायकली चौका-चौकांत उपलब्ध करून दिल्या होत्या. स्मार्ट मोबाइलद्वारे तासाचे १० रुपये भाडे भरल्यानंतर त्या सायकली चालवण्याची सोय होती. परंतु, त्या उपक्रमास नागरिकांचा प्रतिसाद मिळाला नाही. काही सायकलींची तोडफोड करण्यात आली. तर काही सायकली चोरीस गेल्या. त्यामुळे तो उपक्रम काही महिन्यांतच गुंडाळण्यात आला. सायकल चालवण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी पालिकेने सुरू केलेले इतर उपक्रमही बंद आहेत.

> शहरातील सायकल ट्रॅकची अवस्था अतिशय गंभीर आहे. विशेष म्हणजे प्रशासन किंवा राजकीय मंडळी यांचे कोणाचेही याकडे लक्ष नाही. सायकल ट्रॅक पुणे विद्यापीठ येथे स्वतंत्र फुटपाथच्या बाजूला बांधलेला आहे. त्याच्यावर कोणतेही वाहन जाऊ शकत नाही. त्याप्रमाणे शहरात सायकल ट्रॅकची रचना गरजेची आहे. शहरामध्ये महापालिकेने फक्त रोडच्या बाजूला लाल पट्टे मारून सायकल ट्रॅक असे फलक लावले आहेत. त्यावर सर्रास चारचाकी वाहनांचे पार्किंग, अतिक्रमण होते. पालिकेने याकडे लक्ष दिले पाहिजे. बेंगलोरच्या धर्तीवर फुटपाथवरच ग्रीन पट्टा मारण्यात यावा.
>
> - गजानन खैरे, अध्यक्ष - इंडो ॲथलेटिक सोसायटी

> नागरिकांनी पायी किंवा सायकलवर प्रवास करावा म्हणून महापालिका सुरक्षित असे 'सायकल ट्रॅक' व पादचारी मार्ग तयार करीत आहे. एकूण ३८ किलोमीटर सायकल ट्रॅक तयार झाले असून अंदाजे ४० किलोमीटर सायकल ट्रॅकचे काम सुरू आहे. नाशिक फाटा ते वाकड रस्त्यावर सायकलस्वारांकडून वापर केला जातो. जवळच्या अंतरावर जाण्यासाठी नागरिकांनी सायकल वापरावी, यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. अतिक्रमण व वाहनांवर वेळोवेळी कारवाई होत आहे.
>
> - बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका

शहरात ४५ मीटर व त्यापेक्षा अधिक रुंदीच्या रस्त्यांवर स्वतंत्रपणे सायकल ट्रॅक बनवण्यात आले आहेत. ज्या ठिकाणी कमी रुंदीचे रस्ते आहेत. तेथे लाल रंगाचे पट्टे तयार करून 'सायकल ट्रॅक' तयार करण्यात आले आहेत. शहरात विविध रस्त्यांवर एकूण ३८ किलोमीटर सायकल ट्रॅक तयार झाले आहेत. त्यावर कोट्यवधी रुपये खर्च झाला आहे, तर अंदाजे ४० किलोमीटर सायकल ट्रॅकचे काम सुरू आहे. काही सायकल ट्रॅक महापालिकेने अर्बन स्ट्रीट रस्त्यांवर केले असून काही स्मार्ट सिटी कंपनीने केले आहेत.


काही रस्त्यांवर ट्रॅक बनवण्यात येणार आहेत. परंतु, सायकल ट्रॅक एकसलग नसल्याने अनेक अडथळ्यांचा सामना सायकल चालवताना करावा लागतो. सायकल ट्रॅकवर मध्येच झाड, बाके, कठडा, डिपी बॉक्स, दिव्याचा खांब, पार्क केलेले वाहन, विक्रेते, दुकानदारांचे साहित्य, राडारोडा, कचऱ्याचे ढीग, नामफलक, तुटलेले चेंबरचे झाकण, तुटलेले केबल, उघड्या वीजवाहक केबल, अतिक्रमण असे असंख्य अडथळे आहेत. त्यामुळे सायकलस्वारांना सुरक्षितपणे सायकल चालविता येत नाही. परिणामी, सायकल ट्रॅकसाठी केलेला कोट्यवधी खर्च पाण्यात गेल्याचे चित्र आहे. जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. त्यात अनेक लहान-मोठे अपघात होतात. त्या कारणांमुळे सायकल ट्रॅक असूनही ते सायकल चालविण्यासाठी उपयुक्त ठरत नाहीत.

# चौका-चौकातील अनधिकृत रिक्षा स्टॅण्डमुळे वाहतूक कोंडी

## शहराच्या विविध भागात, विनापरवाना, अनधिकृतपणे आणि अनियंत्रितपणे रिक्षा स्टॅण्ड उभे राहिले आहेत,यामुळे प्रवाशांना आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शहराच्या विविध भागात, विनापरवाना, अनधिकृतपणे आणि अनियंत्रितपणे रिक्षा स्टॅण्ड उभे राहिले आहेत. यामुळे प्रवाशांना आणि वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः मेट्रोच्या फीडर सेवेसाठी केवळ मोजक्याच रिक्षांना परवानगी देण्यात आली असताना, शहरातील मोरवाडी चौक, नाशिक फाटा, वल्लभनगर परिसरात अनधिकृत रिक्षा स्टॅण्ड्सचे पेव फोफावले आहे.



### अनधिकृत रिक्षा स्टॅण्डमुळे वाहतूक कोंडी

» मोरवाडी चौकात झालेल्या मेट्रोच्या थांब्यामुळे रिक्षा स्टॅण्ड उभे राहिले आहेत. रस्त्यावरच उभ्या केलेल्या रिक्षांमुळे वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. एकीकडे सिग्नल, तर दुसरीकडे रस्त्यावर आलेली रिक्षांची रांग तसेच चौकातील दुकानात येणाऱ्या ग्राहकांच्या चारचाकी गाड्या सर्रासपणे रस्त्यावर उभ्या असतात. पोलीस थातूरमातूर कारवाई करतात. गर्दीतून मार्ग काढताना वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मनस्ताप होत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक विभाग आणि आरटीओच्या दुर्लक्षामुळे रस्ते अडवणाऱ्या या रिक्षा स्टॅण्ड्सने वाहतूक कोंडी वाढली आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणा यांच्याकडून यावर कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. नागरिकांच्या तक्रारी असूनही ही परिस्थिती कायम आहे. शहरातील वाढती वाहतूक समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाकडून तत्काळ उपाययोजना होण्याची गरज आहे.

मेट्रो प्रवाशांसाठी पीएमपीएमएलसह रिक्षांची देखील फीडरसेवा सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी मेट्रोच्या प्रत्येक थांब्यावर काही शेअर रिक्षांची सेवा सुरू करण्यात आली. प्रत्येक थांब्यावर किती रिक्षा वाहतूक करतील यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने शहरातील रिक्षा संघटनांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून ही संख्या ठरवली होती.

त्यानुसार, प्रत्येक थांब्यावर मोजक्याच शेअर रिक्षांना परवानगी देण्यात आली. मात्र या नियमांचे उल्लंघन होऊन त्या त्या ठिकाणी शहरात आता बेकायदेशीर रिक्षा स्टॅण्ड उभारले गेले. आता त्यामुळे तेथील रहदारीची कोंडी होत वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. सामान्य नागरिकांना दररोज याचा नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, मुख्य चौकापासून किमान ७५ मीटर अंतरावर बस अथवा रिक्षा स्टॅण्ड असले पाहिजे. यामुळे वाहतूक व्यवस्था सुरळीत राहू शकते. मात्र, शहरात या नियमांचे सर्रास उल्लंघन झालेले दिसून येत आहे.

# नायलॉन मांजामुळे मंचरमध्ये दोघेजण जखमी

## कारवाईबाबत पोलीस प्रशासन व नगरपंचायत प्रशासन यांच्यात उदासिनता

**पुणे | प्रतिनिधी**

मंचर (ता. आंबेगाव) येथे पतंग उडवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नायलॉन मांजामुळे दोघेजण जखमी झाल्याची घटना मंगळवार, दि. १४ रोजी घडली आहे. मांजा वापरावर बंदी असतानाही मंचर शहरात नायलॉग मांजा आला कुठून ? याबाबत चर्चा सुरू झाली आहे. पोलीस प्रशासन व नगरपंचायत प्रशासन यांची मांजा कारवाईबाबत उदासीनता दिसून आली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की मंचर (ता. आंबेगाव) येथील एसटी बस स्थानक परिसरात दुपारी दुचाकीवर चाललेल्या तरुणाच्या गळ्यात नायलॉन मांजा अडकल्याने गळ्याला जखम होऊन तरुण जखमी झाला आहे.

तरुणाने तत्काळ दुचाकी थांबवल्याने मोठा अनर्थ टळला असून तो थोडक्यात बचावला आहे. तर दुसऱ्या एका पायी चालणाऱ्या तरुणाच्या हाताच्या बोटांना मांजामुळे जखम झाली आहे. जखमी झालेल्या दोन्ही तरुणांची नावे समजली नाही. मंचर बस स्थानकाच्या जवळपासच्या उंच असलेल्या इमारतींवर पतंग उडवले जात होते. या पतंगापैकी काही पतंग मांजासह तुटून मंचर बस स्थानकाजवळ आल्याने पतंगाच्या मांजाने दोन तरुण जखमी झाले आहे, असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी सांगितले.

मांजा विक्रीवर बंदी असतानाही मंचर शहरात मांजा कसा आला ? पोलीस प्रशासन यांनी पतंगासाठी मांजा विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी केली नाही का ? केली तर त्यांना मांजा सापडला नाही का ? असे अनेक प्रश्न नागरिकांना पडले आहेत. तर बंदी असतानाही मांजा विक्री करणाऱ्या दुकानावर कारवाई करण्याचे आदेश असतानाही मंचर पोलीस व नगरपंचायत प्रशासन विभाग फक्त डोळे झाकून पाहत राहिला का? असा प्रश्न देखील अनेक नागरिकांनी उपस्थित केला आहे. मंचर परिसरात पतंग उडवण्यासाठी मांजाचा वापर दिसून आल्याने लहान मुले, महिला नागरिक, पक्षी, प्राणी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मकर संक्रांतीच्या सणानिमित्त पतंग उडवण्याची परंपरा गेली अनेक वर्षांपासून आहे. मात्र, पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा धागा हा साधा असावा असा नियम असून मांजा वापरावर राज्यात बंदी आहे बंदी असतानाही मांजा विक्री करणाऱ्या दुकानावर कारवाई करण्याचे आदेश असतानाही मंचर पोलीस व नगरपंचायत प्रशासन विभाग फक्त डोळे झाकून पाहत राहिला का? असा प्रश्न देखील अनेक नागरिकांनी उपस्थित केला आहे.



> मंचर शहरात सोमवार, दि.१३ रोजी पोलिसांनी पेट्रोलिंग करून मांजा विकणाऱ्या दुकानदारांबाबत तपासणी केली होती. परंतु मिळाले नाही, मांजा विक्री कोणी करत असेल तर याबाबत कोणाला काय माहिती असल्यास त्यांनी मंचर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, त्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल.
>
> - श्रीकांत कंकाळ, पोलीस निरीक्षक, मंचर पोलीस ठाणे.

> मंचर शहरात मांजा विक्री कोणी विकत असेल तर त्यांनी तात्काळ मंचर नगरपंचायत किंवा मंचर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. मांजा विक्रीला बंदी आहे ,हे दुकानदारांना आम्ही आवहान करून सांगूनही कोणी जर विकत असेल तर त्याच्याविरोधात मंचर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणार आहे.
>
> - गोविंद जाधव, मुख्याधिकारी, मंचर नगरपंचायत.

### सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

» मकर संक्रांतीच्या सणानिमित्त पतंग उडवण्याची परंपरा गेली अनेक वर्षांपासून आहे. मात्र, पतंग उडवण्यासाठी वापरला जाणारा धागा हा साधा असावा असा नियम असून मांजा वापरावर राज्यात बंदी आहे. तरीही मंचर परिसरात पतंग उडवण्यासाठी मांजाचा वापर दिसून आल्याने लहान मुले, महिला नागरिक, पक्षी, प्राणी यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# स्वप्न साकार करताना प्रयत्नाची पराकाष्टा करा : प्रा. नितीन बानुगडे पाटील

## 'गरुडझेप यशाची' या विषयावर प्रा. बानुगडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन, शिष्यवृत्ती परीक्षा व विविध खेळामध्ये प्रवीण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान

**पुणे | प्रतिनिधी**

दिखाऊ नाही तर टिकाऊ बना, मोबाइल कामापुरता वापरा, मोबाइलचे व्यसनी होऊ नका, अभ्यास व मैदानी खेळ यांचा समतोल राखा, आई- वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवा व स्वतःची स्वप्ने साकार करताना प्रयत्नाची पराकाष्टा करा, असे प्रतिपादन प्रसिद्ध प्रेरक व्याख्याते प्रा. नितीन बानुगडे पाटील यांनी केले.

बारामती शहरात १७२९ आचार्य अकॅडमीच्या आचार्य डिजिटल ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी 'गरुडझेप यशाची' या विषयावर प्रा. बानुगडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले होते. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत विचारमग्न केले. शिष्यवृत्ती परीक्षा व विविध खेळामध्ये प्रवीण मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी आचार्य अॅकॅडमीचे संस्थापक प्रा. ज्ञानेश्वर मुटकुळे, संचालक सुमित सिनगारे, कमलाकर टेकवडे, प्रवीण धवडे, सीओओ निलेश बनकर व प्रतीक पाटील, प्रशांत फरांदे, संजय कापरे, बापू काटकर, संभाजीनगरच्या उपविभागीय पोलीस अधिकारी आरती मुटकुळे, अजितदादा इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष संग्राम मोकाशी, पालक,विद्यार्थी आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सावळे पाटील यांनी केले. प्रा. सुमित सिनगारे यांनी आभार मानले.



### देशात सर्वाधिक टॉपर्स 'आचार्यचे' असावेत

» आचार्य अकॅडमीचे संस्थापक प्रा. ज्ञानेश्वर मुटकुळे म्हणाले की, डॉक्टर, इंजिनियर बनण्याचे स्वप्न व संरक्षण क्षेत्रात अधिकारी होण्यासाठी विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानच्या सुविधा देण्याचा प्रयत्न आहे. नीट, जेईई, सीएटीच्या परीक्षेत देशात जास्तीजास्त टॉपर्स आचार्य अॅकॅडमीचे यावेत यासाठी प्रयत्नशील आहे. डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा उद्देश असून डिजिटलच्या माध्यमातून देखील विद्यार्थी घडतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### 'आचार्यक'डून आदर्श पिढी घडविण्याचे काम

» प्रा. बानुगडे पाटील म्हणाले की, मुले अनुकरण करतात. त्यामुळे पालकांनी सुद्धा मोबाइचा वापर कामापुरता करावा, भविष्याचा विचार करून अभ्यास व मैदान यांचे योग्य नियोजन करा. आदर्श व संस्कारक्षम पिढी घडविण्याचे काम आचार्य अॅकॅडमी विविध उपक्रमाच्या माध्यमातून करीत आहेत. आचार्यचे काम कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. यावेळी स्कॉलरशिप परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी व विविध खेळांमधील विजेत्या खेळाडूंचा सन्मान प्रा. बानुगडे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.